# महाराष्ट्र विधानपरिषद

सत्यमेव जयते

## आवाहनपत्र

क्रमांक : ३११६/ई-२,
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन,
मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२२ / फाल्गुन ४, १९४३ (शके)

**प्रति,**

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
(मंत्री व राज्यमंत्री यांसह).

**महोदय/महोदया,**

कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांनी भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४ अन्वये त्यांना प्रदान केलेले अधिकार वापरून महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन, गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात भरविण्याचे ठरविले आहे. (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, अधिसूचना क्रमांक ३११२/ई-२, दिनांकित २३ फेब्रुवारी, २०२२ पहा). म्हणून, महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम ३ अन्वये मी आपणांस विनंती करतो की, आपण वर नमूद केलेल्या वेळी मुंबई येथील विधान भवनात विधानपरिषदेच्या अधिवेशनासाठी उपस्थित रहावे.

आपला स्नेहांकित,

**(राजेन्द्र ग. भागवत),**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

(शा.म.मु.) एचबी २४०३ (६००---२-२०२२)